Vol 2 Issue 11 May 2013 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 11, May. 2013
**ISSN:-2231-5063**
Available online at www.aygrt.isrj.net

ORIGINAL ARTICLE

GRT

# *पेशवेकालीन रोखे आणि कर्ज वसुलीच्या पध्दती*

*प्राचार्य डॉ. बी.व्ही. चौधरी*

वसुंधरा कला महविद्यालय, जुळे सोलापूर, सोलापूर.

***सारांश :***

पेशवेकाळात सावकारांना मान व प्रतिष्ठा होती. कारण छत्रपती शाहू महाराज आणि पेशव्यांना सावकारांचे महत्त्व माहिती होते. ते सावकारांना आपल्या घरी बोलावून त्यांच्याबद्दल जवळीक आणि जिव्हाळा दाखवत असत. सावकरांना त्यांची स्वतःची गावे वसविण्यासाठी मदत करत असत. त्यांना विविध स्वरूपाची सवलती देत असत. इ.स. 1725 मध्ये शाहूने मोहनदास यास मदतीसाठी साताऱ्यास बोलाविले होते. 1740 मध्ये बाजीराव पेशव्यांनी दिक्षित–पटवर्धन यांना नाशिकहून पुण्यास बोलाविले होते व त्यांना सर्वतोपरी मदत केली. पुण्याच्या बुधवार पेठेची स्थापना करणारे भिडे सावकारांना पेशव्यांनी पुण्यास बोलाविले होते. पेशव्यांनी त्यांना वित्तीय बाबतीत बरीच मदत केली. बारामतीच्या बाबूजीनाईक जोशी यांना पेशव्यांनी पुण्यास बोलावून घेतले. या सर्व सावकारांनी पेशव्यांशी जवळचे संबंध निर्माण केले होते.

## ***प्रस्तावना:***

मराठी राज्याची राजधानी पुणे आणि पुण्यातील शनिवारवाडयाला या सावकारांमुळे महत्त्व प्राप्त झाले होते. म्हणून विविध प्रांतातील सावकार, व्यापारी आणि कारागीर यांना पुण्याचे आकर्षण निर्माण झाले होते. पुणे हे 18 व्या शतकात भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील सावकार व व्यापारी यांचे निवासस्थान झाले होते. शनिवार वाडयाभोवती अनेक स्थानिक सावकारांनी आपला ठसा निर्माण केला होता. म्हणून व्यापाराची वाढ होऊन पैशाच्या देवघेवीचे व्यवहार मोठया प्रमाणात वाढले होते. 1750 ते 1818 म्हणजे पेशवाईच्या अंतापर्यंत पुण्यास राजधानी म्हणून आर्थिक सुबत्तता प्राप्त झाली होती. सरंजामदार, सरदार आणि सरकारी नोकर यांना स्थाईक होण्यास हे शहर अनुकूल होते. 1760 मध्ये पुण्याची लोकसंख्या 40,000 होती. जी केवळ 40 वर्षात म्हणजे 1800 मध्ये 10,000 लाख झाली. यावरून शहराच्या वाढीचा वेग लक्षात येतो.

## ***खाजगी क्षेत्र :***

गरीब आणि समाजातील खालच्या वर्गाला कर्ज देतांना व्याजाचा दर कमी होता. कर्जदार कर्ज घेतांना व्याजदरात कोणताही फरक न करता गहाण ठेवून किंवा गहाण शिवाय कर्ज घेत असत. सोने आणि चांदीच्या मौल्यवान दागिन्यांवर कर्ज देण्यात येत होते. घर, मूल्यवान, वस्तू, जमीन, संपत्ती, प्राणी किंवा सरकारी कागदपत्रे, वतन, इनाम इ. गोष्टी जामिन म्हणून दिल्या जात. वेळेवर कर्जाची रक्कम परत करू शकला नाही तर व्याजाचा दर वाढविला जात होता. जर करार करतेवेळी सूट किंवा बिनसूट असा करार केला असेल तर त्याप्रमाणे व्याज आकारले जात असे किंवा वजा केले जात असे. कर्ज परत फेडीपर्यंत व्याज चालूच राहत असे. ठराविक मुदतीच्या शेवटीपर्यंतच हे व्याज थांबत नसे. तरूण मुली, स्त्रिया, कारागिर, पाथरवट, धोबी, कासार हे कर्ज घेणारे गरीब वर्गातील लोक होते[1]

***व्याजाचा दर :***

सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील कर्जाच्या विविध कागदपत्रांचे परिक्षण केल्यानंतर असे आढळून आले की, व्याजाच्या दराचा सर्व मान्य किंवा सर्वसंमत असा नियम ठरवून दर ठरवलेला नव्हता. रक्कम किती मोठी किंवा लहान असो कर्ज घेणारा प्रतिष्ठित किंवा सामान्य गरीब असो प्रत्येक वेळा व्याजाचा दर बदलत असे. कारण ऋणकोची गरज आणि पैशाची उपलब्धता यावरून हा दर ठरत होता. इ.स. 1720 ते 1740 या काळातील व्याजाचा दर नंतरच्या काळाच्या तुलनेत अधिक होता. कदाचित सावकार हे युध्दाच्या मदतीसाठी पतपुरवठा करणे धोकादायक समजत अशी काही शक्यता दिसत नाही. सुरवातीच्या काळातील सावकारांची संख्या ही अत्यंत कमी होती. महाराष्ट्राबाहेरील सावकार महाराष्ट्रात येऊन व्यवसाय अद्यापही सुरू केलेला नव्हता म्हणून व्याजाचा दर हा पैशाची उपलब्धता यावर अवलंबून होता. म्हणूनच इ.स. 1720 ते 1740 हा दर दीड ते तीन टक्के दरमहा असा होता. हा दर सरकारला दिलेल्या कर्जावरही आकारण्यात येत होता. कारण खडया सैन्याच्या सामान्य माणसांच्यासाठीही हा दर एक ते दीड टक्का एवढा होता. तरीही लोक कर्ज काढीतच. ब्राह्मण सावकार सरकारला कर्जे देतांना खालीलप्रमाणे कर्ज देत व दर आकारीत असत.[2]

***1) कर्ज रोखा :***

हा कर्ज काढताना अत्यंत प्रचलित असलेला प्रकार होता. या कर्जरोख्यात ऋणको कर्ज परतफेडीची हमी देत असे. किती मुदतीसाठी कर्ज दिलेले आहे आणि व्याजाचा दर काय आहे हे ही या कर्ज रोख्यामध्ये नमूद केलेले आहे. व्याज दरामध्ये सूट देण्यात आलेली आहे किंवा नाही याविषयी देखील यात लिहिलेले असे. या कर्ज रोख्यावर स्वतंत्र जामिनदाराची सही लागत असे.

***2) वायदा रोखा :***

वायदा रोखा हा खातेदारांना करावा लागे. हप्त्या हप्त्याने कर्ज परत करण्याच्या अटीचा हा करार म्हणजे वायदा असे.[3]

श्री

यादी पेशजी रसदेचा अैवज लिहून दिल्हा त्या सिवाय जाजती सुमा सित समानीनमया व अलफे

| | |
|---|---|
| 1000 | प्रांत राजापुरी नि।। गोविंदराव माणकर रसद रूपये 21200 पैकी पेशजी लिहून दिल्हे 20200 बाकी त्रिंबक नारायण मेहेंदळे याचे वचन पंधराशे रूपये होते त्यापैकी पाचये रूपये पुत्राचे नावे नेमूण देऊन हजार रूपये कमी केले ते घ्यावयाचे रूपये |
| 2700 | तालुके अक्कीनगड व बदरवाडी नि।।0 बाबुराव वासलकर रसद रूपये 26620 पैकी पेशजी लिहून दिल्हे 23920 रू. बाकी सिंबदी पैकी कारकून सुभा ठेवणूकी दूर करावे त्या बद्दल अैवज घ्यावयाचा आजमासावर करार जाहला आहे |

| तो | रूपये |
|---|---|
| 2400 | अक्कीनगड |
| 300 | बिरवाडी |
| ……… | |
| 2700 | (मागील बाजू) |

| | |
|---|---|
| 2600 | पा. सावसे नि।। भारकर रसद व।। अजमास अखलासीचा द रू. 126000 पैकी पेशजी रसद लिहून दिल्ही ते रू. 10000 बाकी जाजवी रू. 1000 अैन रसद |
| | 1000 अैन रसद |
| | 1600 जससाल मजकुरापासून दर सालशंभरखंडी |
| | ........... घातला त्याज ब।।0 साल मजकुरचा |
| | 2600 |
| 10000 | तालुके कुकर मुंढे व सु।।0 बुधावण नि।। नारायणराव यादव |
| | 8000 कुकरमुंडे ब।। अजमास करारी रूपये 9000 पैकी लग्नपटी ब।। नेमीले 1000 रूपये बाकी तूर्त घ्यावे ते रूपये |
| | 2000 सा।0 बुधावल अजमासावर मखलासी होणे |
| | ........... सदरहू रूपये तूर्त घ्यावे |
| | 1000 |
| 3825 | सावकार वसईकर याजकडे विसाजी केशव लेले यांचे कर्ज येणे त्याचा ठराव भिकाजी गोपाळ यांचे विद्यमाने हुजूर होवून हप्तेबंदी चार साला ठरविली त्यास साल मजकूरचा हफ्ता याची याद अेकंदर ठरावाची महादजी रघुनाथ दि।।0 निंबाजी गोपाळ याज बराबर पुण्यास गेली असे चार साला हफ्त्याची बेरीज 11412।।. पैकी सालम जहुरचे हफ्त्याचे |
| ......... | |
| 20125 | |

### *3) सरकत रोखा :*

सरकत म्हणजे भागीदार ज्या वेळेस भागीदारीत कर्ज काढले जात असे. त्यावेळी हा रोखा करण्यात येत असे. विशेषतः शेतकरी आपल्या शेतीसाठी असा रोखा करून कर्ज काढीत असत. वायदा रोख्याचे एक उदा असे.

।। श्री।।

भाद्रपद व 13 ⁄ 1659
11—9—1737

राजश्री कालपाटील जगन्नाथा गोसावी यांनी छ स्ने।. मल्हारराम आसीर्वाद उपरी तुमचे रू. 1022।। एक हजार साडेबावीस आम्हाकडे आहेत ते रू।। जेव्हा मागाल तेव्हा देऊ बहुत कार्ये लिहिणे मिती भाद्रपद वद्य 13 त्रयोदशी श. 1659[4]

हे पत्र मल्हारराम धारापुरे याने काळोजी पाटील यास लिहिले आहे. ही वचन चिठ्ठी आहे. या पत्रात व्याजाचा दर, व्याजाची मुदत किंवा कर्जफेड केली नाही तर आकारावयाचा दंड याचा उल्लेख नाही. या पत्रातील भाषा ही वचन चिठ्ठीतील भाषेप्रमाणे आहे किंवा ड्राफ्टप्रमाणे आहे. जरी हे पत्र 1737 मधील इ.स. मधील असले तरी 1800 व्या शतकातीलच आर्थिक माहिती हे पुरविते.

### कर्ज वसुली :
### कर्ज वसुलीतील सरकारचा सहभाग :

सरकार स्वतः सावकारांना प्रचंड दराने व्याज देत होते. तरी दस्तऐवज शुल्कात कोणताही बदल केला गेला नाही. सामान्य जनता, गरीब शेतकरी, करदात्यांना या पिळवणूकीतून वाचविण्यासाठी सरकारने कायदे किंवा नियम केले नव्हते. त्या काळातील सर्व सामान्य माणसांच्या गरजा मर्यादित होत्या व शक्यतोवर ते कर्ज घेणे टाळत असत पण घ्यावेच लागे तर सामाजिक आणि नैतिक दबावामुळे ते शक्य तेवढया लवकर परत करण्याचा प्रयत्न करीत. कारण व्याजाचा प्रचंड दर हा देखील त्यास कारणीभूत होता. लोकांची अशी श्रध्दा होती की, आपल्या आयुष्यात आपण कर्ज बाजारी मेलो तर दुसऱ्या जन्मात आपणास त्रास होईल. पहिला बाजीराव व माधवराव यासारखे शक्तीशाली पेशवे देखील यावर विश्वास ठेवीत होते. भारतीय परंपरा आणि श्रध्दा यावर त्यांचा विश्वास होता. पहिला बाजीराव यांनी ब्रम्हेंद्र स्वामी यास म्हटले, ''कर्ज फिटत नाही आता वाचविण्याचे सार्थक काय?'' बाजीरावाने उत्तरेतील राजकीय सत्ता विस्ताराचे जे धोरण आखले होते आणि त्याला ज्या अडचणी येत होत्या त्यापेक्षा बाजीरावास कर्जाची चिंता अधिक होती. माधवराव मृत्यू शय्येवर असतांना नाना फडणीसास बोलावून आपल्या कर्जाची जबाबदारी स्वीकारावी अशी अंतिम इच्छा प्रगट केली होती. त्या प्रमाणे दुल्लभदास या सावकाराने त्यांची कर्जाची हमी घेतली होती. शक्य होईल तितक्या लवकर कर्जाची परतफेड करण्याचा प्रकार त्या काळी होता. जर वडिलांनी काढलेले कर्ज परतफेड केले नाही तर त्याच्या परतफेडीची जबाबदारी मुलाची असे आणि मुलगा ती स्वीकारत असे.[5]

एखादी व्यक्ती कर्जाची परतफेड करू शकली नाही तर सरकार त्यास वेळेवर कर्जाची परतफेड करण्याचा हुकूम देत असे व त्याच्या विरूध्द कायदेशीर कारवाई सुरू करीत असे. त्यासाठी सरकार कर्जदारावर कर्ज चौथाई हा कर आकारीत असे.

### कर्ज चौथाई :

सरकार कायदेशीर कारवाई करून कर्ज वसुली करीत असे. त्याचा खर्च म्हणून कर्जाच्या 1/4 रक्कम स्वतः घेत असे. इ.स. 1756 मध्ये या शीर्षकाखाली राघोबा दादाने बरीच मोठी रक्कम प्राप्त केली होती.[6]

कर्ज चौथाई जमा सदाशिव वाळूंजकर कर्ज लोकांकडे येणे होते. त्यास ब।।शागीर्द बरोबर दिले. त्यात मशारनिलेनी कर्ज उगवून दिले अन चौथाई सरकारात घेतले जमा रू.1000

कोचवन, धरणे, तगादा याशिवाय धरणे तगादा वगैरे कर्ज वसुलीसाठी दबाव टाकण्याचे आणखी काही मार्ग होते. कोचवन सावकार कोचवनचा वापर करीत. त्याचा अर्थ तगादा म्हणजे दबाव कर्जाच्या त्वरीत वसुलीसाठी धरणे धरावे लागे. यासाठी ब्राह्मणांची नेमणूक केली जात होती. कर्जदाराच्या दारात ब्राह्मणांची धरणे धरण्यासाठी नेमणूक करून कर्ज परत करेपर्यंत ऋणकोची फजिती केली जात होती.

### धरणे :

18 व्या शतकातील धरणे धरण्याचे एक उदाहरण अत्यंत उपयुक्त आहे. मराठा सरदार होळकरांनी सावकार गोपाळदास भगवानदास काशीकर यास अडीच लाख रूपये कर्जासाठी लिहिले पण भोसल्यांना तीन लाख रूपये कर्ज पाहिजे होते म्हणून कानडे यांनी कर्ज देणे नाकारले. चिपळूणकर या सावकाराचे होळकरांकडे असलेले कर्ज आणखी वसुल झाले नव्हते. म्हणून चिपळूणकरांनी होळकरांच्या घरापुढे कानडे यांची धरणे धरण्यासाठी बसण्याची व्यवस्था करून पाहिली. परंतु ती विनंती त्यांनी नाकारली. कारण कानडे यांचे होळकरांबरोबरचे संबंध चांगले होते म्हणून ते आपला व्यवसाय पुढे चालू इच्छित होते. म्हणून कानडे यांनी धरणे धरण्याचे नाकारले व स्वतः चिपळूणकरांनी होळकरांच्या राजवाडयाबाहेर धरणे धरून होळकरांकडून कर्जे वसूल केले.[7]

### त्याग व आमरण उपोषण :

कर्ज वसुलीचा अधिक प्रभावी मार्ग म्हणजे त्याग होता. जेव्हा कर्जदार कर्जाची परतफेड करीत नाही याची खात्री पटल्यानंतर सावकार किंवा त्याने नेमलेली माणसे कर्जदाराच्या घरापुढे उपोषण करीत. हे उपोषण देवळापुढेही होत असे. जोपर्यंत कर्जाची रक्कम परत मिळत नाही तोपर्यंत ते त्याच ठिकाणी बसून राहत. त्यासाठी त्यांची मरण्याची तयारी असे. उपोषण करातांना जर ब्राह्मण मृत्यू पावले तर कर्जदात्यावर ब्रह्महत्येचे महान पातक केल्याचा आरोप सिध्द होत असे. म्हणून सावकार फार क्वचित प्रसंगी याचा वापर करीत असे.

जर ऋणकोने ठरलेल्या वेळेत कर्जाची परतफेड केली नाही तर हिशोबाच्या शेवटी वाढीव व्याजदराने सर्व हिशोब करून सूट न देता हिशोब करीत ही अट अर्ज घेते वेळेस मान्य करून घेण्यात येत होती. त्यावेळे कर्जास जामीन देण्याची पध्दत अस्तित्वात होती. कमाविसदार हा कर्ज परत फेडीस जामीन असे. सावकार देखील जामीनदार असत.

त्यासाठी दर हजारी 50 रूपये घेत असत. जर जामिनदार नसेल अशा वेळी कमाविसदारास ठराविक रक्कम द्यावी लागत.

स्वारी राजश्री पंतप्रधान सु।। समसेन कर्ज गु।।. कृष्णाजी महादेव व राघो बहिरव दफाने पत्रे

छ 16 जिव्हने राणोजी बलकवडे यांजकडील महालाची करार झाला आहे. त्याप्रमाणे हमीदार तुम्ही सावकारात आणून द्यावे त्यास तूर्त हामीदार कोणी न मिळे सबब सरकारात तुम्ही 2000 रू. दिल्हे ते सहा महिनेपर्यंत बिनव्याजी ठेविले असे पुढे राहिले तरी व्याजदर माहे दरसदे रूपया एक बिनसूट प्रमाणे करार केले असे व अखेर साली मानण्याचा हमीदार आणून देणे.[8]

### *सावकारांच्या संघटना :*

सावकार आपल्या खात्याच्या नोंदी अगदी तारीखवार, वेळेनुसार ठेवीत असत. जर एखादी तक्रार आली तर पंचायतीची नेमणूक केली जात असे. या सर्वांचा विचार करून निर्णय देणे त्यांचे काम होते. या सावकारी संघटना खटल्याचा वाद एखाद्या कोर्टाप्रमाणे सोडवित असत. ही संघटना प्रसिध्द सावकारातून निवडून येणाऱ्या व्यक्तींची होती. त्यात एक अध्यक्ष असे इतर सावकार प्रकरण तपासून पाहून निरीक्षणाअंती निर्णय देत असत. त्यांचा निर्णय एक मताने घेण्यात येत होता व दोन्ही पक्षांवर तो बंधनकारक असे असाच एक निर्णय हरिकृष्ण बिलवकर यांच्या वहीखात्याची चौकशी करण्यासाठी पंचायतीमध्ये आला होता. तो असा –

पुण्याचा कारभार हरिकृष्ण बिवलकर बघत असे. रामाजी महादेच्या मृत्यूनंतर त्याने हिशेब नीट ठेवले नाहीत. कैलासवासी तीर्थरूप यांचा खाजगी कारभार पुणे यांचा मशार निल्हेकडे होता. गाव व कुरण व बागेस जमीन खरेदी करून घेतली वगैरे खर्च परवानगीने व आपल्या अखत्यारीत केला त्यास सन सलास मध्ये तीर्थरूपास देवाज्ञा झाली ते समयी हिशेब मोघाम दाखवून पैका मागो लागले पुरंधर मुक्कामी सरकारात फिर्यादत होऊन राजरी त्रिंबक विनाय सर सुभेदार याने सनद आणली की बानवीचे रईने हिशेब मनास आणून फडशा करावा यावरून पंचाईत नेमून दिल्ली येणे प्रो।।

बाबाजी प्रल्हाद।।2।। रामजी बल्लाभ भाडे।।3।। महादजी कृष्ण चांदोरकर,।।4।। महादाजी वासुदेव।।5।। रामचंद्र अभ्यंकर पंचायतीत हरी कृष्णाकडे सुभेदाराचे देणे निघाले.9

त्याकाळी पंचायतीद्वारे निवाडे करण्याची पध्दत अस्तित्वात होती असे दिसते.

### *सावकारी टपालीची जरूरी :*

त्यावेळचे सावकार नुसती पैशाचीच तेवढी उलाढाल व देवघेव करीत असे नाही तर कापडाचा व सराफीचाही धंदा करणे त्यास सोयीचे जाई. तात्पर्य, स्थलांतर व रोकड द्रव्यांचे कागदी चलनात रूपांतर हे व्यवहारात अवश्य व या कारभाराला टपालाची जरूरही नेहमीचीच असे.

म्हणून सावकारांच्या पदरी हे काम करणारे काही त्यांचेच नोकर असत व ते या गावाहून त्या गावास जात आणि सावकारी हुंडया, वराता, चिठ्ठया, पत्रे यांची ने–आण करीत. या नोकरांना खिजमदार, खास बारदार, मिर्धा असे म्हणत पण हेच काम करणारे हाच धंदा करणारे लोक असत त्यास जासूद कासीद हे नाव असे. या जासुदांचेही जथेदार लोक असत. जथेदार म्हणजे ठेकेदार कॉन्ट्रॅक्टर. 10 जासुदावरील जो नाईक त्यास मिर्धा म्हणत.

असे हे जथेदार किंवा मिर्धे ज्यांना प्रसंगी जासूद पाहिजेत त्यांना जासूद पुरवीत. म्हणजे सावकारमंडळी प्रमाणे सरकारलाही हे जासूद पुरवीत. तरी पण सावकारी टपाल आणि सरकारी टपाल यात अंतर आहे.

सरकारी टपालाला गुप्त बातम्या मिळविणे या दृष्टीने धोका तर सावकारी टपालाला हुंडया, वराता हस्तगत करणे या दृष्टीने धोका. त्यातल्या त्यात सावकारी टपालाला भीती कमी.[10]

येथे सर्वात मुख्य बाब ती म्हणजे सावकार लोकांना इतिहासकालीन सरकार अथवा फौजबंद सरकार आपआपल्या सैन्य शिबीरातून बरोबर घेऊन मुलुखगिरीला जात आणि सावकारही आपणहून जात. कारण सैन्याचा तळ पडे तेथे बाजार भरे किंवा सैन्याच्या मुक्कामात प्रसंगी जो पैसा लागे तो हे सावकार देत व सैन्याच्या मुक्कामाशेजारील गावात असलेल्या सरकारी पेढीवरून किंवा वाणी व्यापाऱ्याकडून पतीवर हुंडया देऊन पैसे घेत अथवा पाहिजे असलेला माल घेत. सारांश, सैन्याबरोबर सावकार असत व तेथेही त्यांचे जासूद कासीत येत आणि टपाली काम चाले. कित्येक सावकारांच्या पत्रांतून आणि जमाखर्ची वहयांतून राजकारणी वार्ता, लढायाच्या हालचाली, राजकारणी इतर घटना आणि तह वगैरेच्या संबंधी जी माहिती मिळते ती सावकारांचा सैन्याशी व लढाईशी असा प्रत्यक्ष संबंध येई.[11]

### *सावकारी बातमी :*

सावकारी कागदपत्रातून या बातम्या कशा येत. त्यांचे प्रत्यक्ष उदाहरण खाली दिलेले आहेत.

प्रसिध्द पानिपतच्या लढाईत जे विश्वासराव पेशवे वीरस्वर्ग पावले. त्यांची सासुरवाडी पुण्याच्या दीक्षित पटवर्धनाकडे होती. या पटवर्धनांच्या नाशिक येथील त्यांच्या जुन्या वाडयात प्रेक्षणीय नक्षीचे लाकूड काम आहे. हे पटवर्धन

सावकार होते. यांच्या शके 1681 ते 1683 या तिन्ही वर्षाच्या रोजनाम्यात (इ.स. 1759 ते 1761) लढायांचे उल्लेख झाले आहेत. रू. 9 ताा खंडू मिर्धा शु. 14 नाना साहेबांचे लष्करात पेसजी कासीद गेला त्याचा अजूरा शेख. असाच दुसरा उल्लेख यापेक्षा महत्त्वाचा आला आहे. तो असा 19 (2) रू. ताझ खंडू मिर्धा वाा 5 नामे खाजगी खर्च परभारे अजूरा 14 रू. नानासाहेबांचे लष्करात भेलसापुढे 6 कोस गेला. त्याचा रू. 15 पैकी वजा 1 महादजी नारायण जोशी यांनी दिल्हा रू. 1.

या दोन उल्लेखांवरून कळते की, पानिपतच्या लढाईत सदाशिवरावभाऊ अडचणीत सापडले होते. त्यास सहाय्य करण्याकरीता नानासाहेब पेशवे पुण्याहून ससैन्य चालले होते. त्यावेळी ग्वालेरच्या नजीक भेलसा हे प्रसिध्द ठिकाण आहे. तेथे नानासाहेब सैन्य घेऊन गेले होते. इतकेच नव्हे तर भेलशाच्या पुढलाही मुक्काम नानासाहेबांनी गाठला होता व म्हणून या पटवर्धनाच्या जासूदाला भेलाशाच्या पुढे 6 कोस जावे लागले. अशा प्रकारे दादासाहेबांच्या लष्करात काल्पी, अष्टी येथे, कलकत्ता, काशी, नागपूर इत्यादी शहरांना महाक्षेत्राच्या ठिकाणी विशेषतः जेथे जेथे सैन्याचे मुक्काम झालेले आहेत तेथे तेथे या सावकारांचे जासूद हुंडया घेऊन म्हणजे पैशाच्या देवघेवी संबंधाने जात असत.

### *जासुदासंबंधी खर्च :*

सावकारांच्या वहयांमध्ये या जासुदा संबंधीचा खर्च मांडण्याची पध्दतीही लक्षात घेण्याजोगी आहे. ती वरून जासुदांचे जथे असत हे स्पष्ट दिसून येते व तशी माहिती मिळण्याजोगी आहे. जो जासुदाच्या या कामगिरीस जबाबदार आहे तो काही प्रत्यक्ष जात नाही आणि जाणाऱ्यास तर पैसे द्यावयाचे आहेत आणि तो तर दुय्यम. या जथेदाराला म्हणजे जासुदाच्या नायकाला पैसे देतांनाही कोणामार्फत दिले ते आणि किती दिवसांत जासुदाने मूळ मुक्कामाला गेले पाहिजे हेही या नोंदीत असते. उदा. 2 रू. ताा उटामिर्धा वाा 4 (रा.1682) मंगळवार जासुद रवाना शहरास बाली चवथे दिवीशी जावे हा करार.[12]

### *सावकारी बातम्यांचे संधान :*

पेशवे यांचे एका पत्रांत असे आले आहे की, 'सावकारी लिहून आल्याची वार्ता सैन्यांत बोलतात तीस पुरवणी पाहिजे.' दुसऱ्या एका पत्रांत स्पष्टच आले आहे की, 'सावकारी बातम्यांचे संधान राखावे.' सरकारी पत्रांतून 'सावकारीत लिहून आले' म्हणजे सावकाराच्या रजासुदांकडून दुसऱ्या सावकारांच्या पत्रांतून 'सावकारीत लिहून आले, असे पुष्कळ वेळा येते.

सावकारी पत्र कसे असते हे समजण्यासाठी उदाहरण म्हणून एका सावकारी पत्राचा भाग दिलेला आहे.

### *समारोप :*

पेशवेकालीन महाराष्ट्रातील सावकारांनी आपल्या व्यवहाराने सामाजिक आणि आर्थिक गरजा पूर्ण केल्या व नवी अर्थव्यवस्था निर्माण केली. ज्यात सरकारी अधिकारी सावकार आणि इतर वर्गातील लोकांचा सहभाग होता. या व्यवस्थेची सुरूवात पहिला पेशवा बाळाजी विश्वनाथ यांच्या काळापासून झाली होती. त्याचा शेवट हा 18 व्या शतकाच्या शेवटाबरोबरच होता. या काळातील पेशव्यांनी सावकारांना संरक्षण दिले होते. त्यांच्याशी वैवाहिक संबंधही प्रस्थापित केले होते. या व्यवहाराला उत्तेजन दिले म्हणून सावकारांचा व्यवसाय भरभराटीस आला होता. ज्यामुळे पेशव्यांना आपले राज्यविस्ताराचे धोरण यशस्वी राबविता आले. शिवाय सामान्य ब्राह्मण माणसाला आपला विकास करता आला. व्याजाचा दर दीड ते चार टक्के एवढा होता. सावकार आपल्या कर्जाची वसुली त्याग इत्यादी मार्गाने करीत हे सर्व संमत व प्रगत मार्ग समजले जात होते. कर्जाचे येणे वसुलीसाठी सरकार त्यांना मदत करीत असत. अधिकाधिक पेशवे सरकार आपल्या सावकारांचे पत आणि प्रतिष्ठा यांच्या रक्षणसाठी अनेक उपाययोजना करीत असत.[13]

सावकारी व्यवसायाचा विकास पेशव्यांच्या संरक्षणाखाली होत होता. ब्राह्मणांना संरक्षण देण्यात आले होते. इतरांना त्या व्यवसायात बंदी नसली तरी सवलती नव्हत्या. महाराष्ट्रात जे सावकारी व्यवसाय करीत होते त्यात ब्राह्मण, गुजराती, मारवाडी, लिंगायत, गोसावी यांचा समावेश होता. सावकारांनी पैसा उपलब्ध करून दिल्यामुळे व्यापार व वाणिज्य यांच्या प्रगतीला हातभार लागला. काही लोकांना चांगले जीवन जगण्यासाठीही या पैशाचा वापर करता आला. पण ते समाजातील एका विशिष्ट वर्गातील होते म्हणून ब्रिटिशांची सत्ता स्थापन होताच त्यात सावकारांचा अंत झाला. त्यांना सवलती नाकारण्यात आल्या. त्यांचे जास्तीचे हक्क नाकारले गेले. शेवटचा पेशवा बाजीराव दुसरा यांचा आर्थिक क्षेत्रातील सहभागी होण्याचा हक्क नाकारण्यात आला. एक प्रकारे सरकार आणि सावकार यांची भागीदारी एकदाची कायमची संपली.

नव्या आर्थिक व्यवस्थेच्या निर्मितीसाठी जुनी सरंजामी व्यवस्था नष्ट होणे गरजेचे होते असेच इतिहासावरून दिसते.

### *संदर्भ*

1) पुराभिलेख, पुणे — घडणी दप्तर क्र. 456, 457
2) तत्रैव — खंड —22, पृ. क्र. 67
3) पेशवे दप्तर — भाग —1, पृ. क्र. 70
4) वैद्य दप्तर — भाग —1, पत्र—32
5) पारसनीस, द.बा. — ब्रह्मेंद्रस्वामी चरित्र ृ. क्र. 40
6) पुराभिलेख, पुणे — घडणी दप्तर, 746
7) चाफेकर, ना. गो. — चिपळुणकर यांचे जमाखर्च भा.इ.स.मं.त्रै. अंक 10 वर्ष 1925 पृ. क्र. 120
8) पुराभिलेख, पुणे — घडणी दप्तर, पृ. क्र. 450
9) चाफेकर, ना.गो. — कल्याणचे सुभेदारांचे जमाखर्च भा.इ.स.मं., पुणे
10) जोशी, श.ना. — मराठेकालीन समाजदर्शन पृ. क्र. 163
11) तत्रैव — पृ. क्र. 164
12) तत्रैव — पृ. क्र. 165
13) तत्रैव — पृ. क्र. 166

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org